मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 3 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# 'पाण्याची सोय तुम्हीच करा'

**असे पत्र महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी डॉ. योगेश म्हसे यांना पाठविले : आता पाण्यावरून महापालिका आणि पीएमआरडीए प्रशासन आमने-सामने आले आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला गेल्या पावणेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू असून दिवसेंदिवस लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. याचा पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण येत असून पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करणे महापालिकेस जिकिरीचे होत आहे. त्यामुळे तुमच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी पाण्याची तुम्हीच किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सोय करावी, असे पत्र महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. योगेश म्हसे यांना पाठविले आहे. त्यामुळे आता पाण्यावरून महापालिका आणि पीएमआरडीए प्रशासन आमने-सामने आले आहे.




पीएमआरडीएने पाण्याची उपलब्धता असल्याशिवाय मोठ्या बांधकाम आणि समूह गृहबांधणी प्रकल्पांना बांधकाम परवानगी न देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यामध्ये सुधारणा करत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदांनी संबंधित गृहप्रकल्पांना पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले तर, बांधकाम प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी घेतला आहे. प्राधिकरणाच्या हद्दीतील पाच किलोमीटर परिघाच्या क्षेत्रातील ग्रामीण भागांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी महापालिका, नगरपालिका आणि जल जीवन प्राधिकरणाची आहे. तसा शासन निर्णय आहे. त्यामुळे संबंधित शासकीय यंत्रणांनीच पाणीपुरवठा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार डॉ. म्हसे यांनी पालिका आयुक्त सिंह यांना 2 सप्टेंबरला पत्र पाठवून प्राधिकरणाच्या हद्दीतील पाच किलोमीटर परिघाच्या क्षेत्रातील ग्रामीण भागांना पाणीपुरवठा महापालिकेने करावा, अशी मागणी केली.\

### पाणी पुरवठा करण्याची आमची जबाबदारी नाही

» **पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची कमी उपलब्धता यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणे महापालिकेस शक्य होणार नाही. पीएमआरडीए हद्दीतील पाणीपुरवठ्यासाठी पीएमआरडीए व तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याची कार्यवाही तुमच्या स्तरावर करावी. हद्दीपासून 5 किलो मीटर पर्यंतच्या बांधकाम प्रकल्पांना पाणीपुरवठा करण्याची कोणतीही जबाबदारी महापालिका स्विकारत नाही, असे पत्र महापालिका आयुक्त सिंह यांनी पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. म्हसे यांना पाठविले आहे.**

पिंपरी-चिंचवड शहराला 25 नोव्हेंबर 2019 पासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहराला सध्या पवना धरणातून 510, आंद्रातून 80 तर एमआयडीसीकडून 20 असे 610 दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जातो. त्यानंतरही स्मार्ट सिटीतील अनेक हाऊसिंग सोसायट्यांना पुरेसे पाणी मिळत नसल्याची सातत्याने ओरड सुरू असते. एकीकडे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत सध्यस्थितीत सुमारे 30 लाखांच्या घरात लोकसंख्या गेली आहे. या लोकसंख्येला पाणी पुरवठा करताना महापालिकेच्या नाकीनऊ येत आहेत. तसेच भामा आसखेड प्रकल्पाचे काम, पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाचे काम अद्याप प्रलंबित आहे. शहराला पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी किमान 3 ते 4 वर्षे कालावधी लागणार आहे. शहरासाठी पाण्याचा नवीन स्त्रोत उपलब्ध नाही.

## नाना काटे यांच्या प्रचारासाठी ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे मैदानात

**महाविकास आघाडीचा उमेदवार ठरला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळ रंगू लागली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेची जागा महाविकास आघाडी कडून कोणाला सुटणार हे अद्याप स्पष्ट झाले नाही. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते नाना काटे यांच्या प्रचाराकरिता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे पाटील हे मैदानात उतरले आहेत. त्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. संजोग वाघेरे पाटील हे नाना काटे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरल्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार ठरला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळ रंगू लागली आहे.



परंतु चिंचवडची जागा महाविकास आघाडीतून शरद पवार गटाला सुटली की उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सुटली याबाबत अद्यापही निर्णय झाला नसला तरी नाना काटे हेच महाविकास आघाडीचे उमेदवार असतील अशी चर्चा रंगू लागली आहे. नाना काटे यांनी ही निवडणूक लढणार असे मनसुबे त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र त्यांना पहिला पर्याय हा महाविकास आघाडीचा राहील असे संकेत देखील त्यांनी दिले आहेत.

त्याच पार्श्वभूमीवर सध्या काटे हे चिंचवड विधानसभा मतदारसंघ पूर्ण पिंजून टाकत आहेत. राज्यातील महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटला नसला तरी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे पाटील यांनी थेट नाना काटे यांच्यासोबत प्रचारात उतरल्यामुळे ही जागा शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सुटली असल्याचे बोलले जात आहे. आता नेमकी ही जागा महाविकास आघाडी कडून कोणाला सुटणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान अजित पवार गटातून भाऊसाहेब भोईर यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. तर माजी नगरसेवक मयूर कलाटे, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, विनोद नढे यांनी थेट ही जागा न सुटल्यास आम्ही बंड पुकारू अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे नेमकी ही जागा कोणाला सुटणार? आणि उमेदवार कोण असणार? त्यावरच पुढील महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून आहे

## घरांच्या नियमितीकरणाला अत्यल्प प्रतिसाद

**प्रशमन शुल्क कमी करून पीएमआरडीए अर्ज मागविणार**

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुंठेवारी कायद्यानुसार घरांच्या नियमितीकरणाला अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे. पीएमआरडीए प्रशासनाने नुकतेच त्यासाठी अर्ज मागविले होते. कमी प्रतिसाद मिळाल्याने आता त्यासाठी आकारले जाणारे प्रशमन शुल्क कमी करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अर्ज मागविले जाणार आहेत. मात्र, त्यानंतरही नागरिकांचा प्रतिसाद मिळणार का ? हे पाहावे लागणार आहे.



पीएमआरडीए हद्दीमध्ये नागरिकांनी गुंठा, दोन गुंठे जमिनी घेऊन घरे बांधली आहेत. ही बांधकामे करताना पुरेसे सामासिक अंतर न सोडणे, मंजूर चटई क्षेत्रापेक्षा जादा बांधकाम करण्याचे प्रकार घडलेले आहेत. या पार्श्वभूमीवर अशी बांधकामे नियमित करता यावीत म्हणून पीएमआरडीएकडून २६ जुलै २०२३ पासून ३० एप्रिल २०२४ पर्यंत अर्ज मागविले होते. या कालावधीत पीएमआरडीए प्रशासनाकडे गुंठेवारीनुसार बांधकामे नियमित करण्यासाठी केवळ १६० नागरिकांनी अर्ज केले. त्यापैकी ४० अर्जांना मंजुरी देण्यात आली. सध्या काही अर्जांवर कार्यवाही सुरू आहे. तर, काही अर्जांबाबत नागरिकांना पत्रांद्वारे त्रुटी कळविण्यात आल्या आहेत. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला विकास (प्लॉटिंग, बांधकामे) यामध्ये नियमित केला जात आहे.

### केवळ चार टक्के प्रशमन शुल्क

» पीएमआरडीएच्या सभेत गुंठेवारीनुसार बांधकामे नियमित करण्यासाठी सुधारित प्रशमन शुल्क निश्चित करण्यात आले आहे. हे शुल्क पूर्वीच्या तुलनेत कमी केले आहे. रेखांकनासाठी (प्लॉटिंग) १८ ऑक्टोबर २०२१ च्या शासन आदेशानुसार विकास शुल्काच्या तिप्पट प्रशमन शुल्क निश्चित केले होते. नव्या बदलानुसार आता त्यासाठी दुप्पट शुल्क आकारले जाणार आहे. रेखांकनातील भूखंडांसाठी रेखांकनानुसार रक्कम वसुली झाली नसल्यास विकास शुल्काच्या तिप्पट रक्कम भरावी लागणार होती. आता ही रक्कम दुप्पट भरावी लागणार आहे. मूळ मंजूर चटई क्षेत्रापेक्षा जादा केलेल्या बांधकामासाठी वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील जमीन दराच्या १० टक्के तसेच सामासिक अंतरात केलेल्या बांधकामासाठीदेखील १० टक्के इतके प्रशमन शुल्क आकारले जाणार होते. मात्र, नव्या बदलानुसार आता हे शुल्क केवळ चार टक्के इतके आकारले जाणार असल्याची माहिती पीएमआरटीएच्या सहायक नियोजनकार विभागाने दिली.

# सुवर्णकार समाजाची भावना: आमदार महेश लांडगेच्या सहकार्यामुळे "आजि सोनियाचा दिनु.."

## आर्थिक विकास महामंडळ निर्मितीची घोषणा : 20 वर्षांपासून प्रलंबित मागणीला मिळाला न्याय

**पुणे | प्रतिनिधी**

सुवर्णकार समाज आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सोनार समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी, बेरोजगारांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, तसेच शिक्षणासाठी मदत होणार आहे.

राज्यातील सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी यशस्वी पाठपुरावा केला, अशी माहिती अखिल भारतीय सोनार समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास भांबुर्डेकर यांनी दिली.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत दि. ३० सप्टेंबर रोजी हा निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळातर्गत हे महामंडळ असेल.



कैलास भांबुर्डेकर सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ बनवावे. यासाठी आम्ही गेल्या २० वर्षांपासून पाठपुरावा करीत होतो. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी याबाबत राज्य सरकारकडे विषय लावून धरला. त्याला यश मिळाले. सुवर्णकार समाजाकडे सधन आणि व्यावसायिक म्हणून पाहिले जाते.

मात्र, सुवर्णकार समाजातील ७० ते ८० टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे. राज्यात २० ते २५ लाख इतकी समाजाची लोकसंख्या आहे. त्यामुळे समाजातील युवकांसाठी उद्योजकता, नोकरी व व्यावसाय यामध्ये प्रोत्साहन मिळावे. या करिता सुवर्णकार आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे, अशी मागणी होती. मात्र, गेल्या २० वर्षांपासून ही मागणी राज्य सरकारकडे प्रलंबित होती. अनेकदा आम्हाला आश्वासन देण्यात आले. मात्र, निर्णय झाला नव्हता. मात्र, विद्यमान सरकारने समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे.

### समाजातर्फे आमदार महेश लांडगे यांचे आभार...


» भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकारच्या माध्यमातून सुवर्णकार समाजासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. या करिता आम्ही अखिल भारतीय सुवर्णकार समाजाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून या मागणीला बळ मिळाले. या महामंडळाचे (उपकंपनी) मुख्यालय मुंबई येथे राहील. तसेच संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या योजना या उपकंपनीमार्फत राबवण्यात येतील. या उपकंपनीस पन्नास कोटींचे भागभांडवल देण्यात येईल. तसेच सोळा पदे भरण्यात येतील, असा निर्णय घेण्यात आला आहे, असेही अखिल भारतीय सोनार समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास भांबुर्डेकर यांनी म्हटले आहे.

# पुनावळे, ताथवडे, वाकडमधील विविध भागांना जोडणारे रस्ते होणार रुंद व सुसज्ज !

## प्रभाग क्रमांक 25 मधील नागरिकांची वाहतूककोंडीतून होणार मुक्तता, भाजप शहराध्यक्ष मा. श्री. शंकरभाऊ जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक २५ पुनावळे येथील वाढते उद्योग, नागरीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येला दळणवळणासाठी सोयीस्कर रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी शहरातील महत्त्वाच्या भागांना जोडणाऱ्या रस्त्यांची बांधणी व दुरुस्ती करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष मा. श्री. शंकरभाऊ जगताप आणि आमदार मा. श्रीमती अश्विनीताई जगताप यांनी सातत्याने महापालिका प्रशासनाकडे केली होती. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून या भागातील रस्ते विकास योजना महापालिकेने मंजूर केली आहे. यामुळे प्रभाग २५ मधील नागरिकांना मोठे दुहेरी मार्ग असणारे रस्ते उपलब्ध होणार आहेत.



प्रभाग २५ पुनावळे, ताथवडे, वाकड या भागामध्ये येणाऱ्या रस्त्यांच्या विकास योजनांना महापालिकेकडून मंजुरी मिळाली आहे. यामध्ये मुंबई-बंगळुरू हायवेपासून काटेवस्तीकडे जाणारा ३०.०० मी. रुंदीचा व 2000 मीटर लांबीचा डी.पी रस्ता, कोयतेवस्ती चौक ते जांभेगावाकडे जाणारा १८.०० मी. रुंदीचा व 1300 मीटर लांबीचा डी.पी रस्ता, मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड २४.०० मी. रुंदीचा व 2520 मीटर लांबीचा डी.पी रस्ता, सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड १८.०० मी डी.पी रस्ता त्यासोबतच मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोडपर्यंत जोडणारा वाकड शिवेपर्यंत १८.०० मी रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. याबरोबरच, ताथवडे गावातून जीवननगरतर्फे एमटीयू कंपनीकडे जाणारा १८.०० मी रुंदीचा व 800 मीटर लांबीचा डी.पी रस्ता, बी.आर.टी रस्त्यापासून पुनावळे गावठाणातून जाणारा १८.०० मी रुंदीचा व 1190 मीटर लांबीचा डी.पी रस्ता, वाकड येथील टीपटॉप हॉटेलपासून अटलांटा २ सोसायटीकडे जाणारा १८.०० मीटर रुंदीचा व 800 मीटर लांबीचा डी.पी रस्ता व गायकवाडनगरमधील १८.०० मी रुंदीचा व 760 मीटर लांबीचा डी .पी रस्त्यांची उर्वरित स्थापत्यविषयक कामे करण्यात येणार आहेत.

प्रभाग २५ पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील रस्त्यांच्या विकास योजनेमुळे प्रभागातील वाहतूककोंडी कमी होणार असून रहिवाशांची सोय होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. वाकड भागातील भूमकर चौक व भुजबळ चौकामधील रस्त्याच्या बांधणीनंतर सध्या होणाऱ्या वाहतूककोंडीस शहरवासीयांना सामोरे जावे लागणार नाही. सदर विविध रस्त्यांच्या विकास योजनांमुळे सुनियोजित पार्किंग व्यवस्था निर्माण होणार आहे. नागरिकांना आरामदायी प्रवास, दळणवळणासाठी सुसज्ज रस्ते, सुरक्षित पदपथे उपलब्ध होणार आहेत. सदर रस्त्यांच्या विकास योजनांमुळे पावसाळी पाण्याचा निचरा होण्यास मदत होणार आहे.

# नवरात्र उत्सव शांततेत, आनंदात पार पाडावा

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचे नागरिकांना आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी नवरात्र उत्सव नागरिकांनी शांततेत व उत्साहात पार पाडावा, असे आवाहन पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले आहे. शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांची बैठक त्यांनी घेतली. यावेळी त्यांनी पोलिसांना नवरात्र उत्सावात काय काळजी घ्यावी, याबाबत सूचना केल्या.

शहरातील तीन पोलीस उपायुक्त कार्यालयांना पोलीस आयुक्त चौबे यांनी भेट दिली. यावेळी पोलीस उपायुक्त संदिप डोईफोडे, विशाल गायकवाड, स्वप्ना गोरे, डॉ शिवाजी पवार, सहायक आयुक्त सचिन हिरे, मुगुटराव पाटील, राजेंद्रसिंह गौर, सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हजर होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले की, नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळणाऱ्या ठिकाणी व आजूबाजूचे परिसरात आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात यावा. आवश्यक ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे लावावेत. दांडिया, गरबा खेळणाऱ्या ठिकाणी व इतरत्र महिला व लहान मुलींचे बाबतीत छेडछाड होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. मंडळांनी देवीची मुर्ती, दांडिया, गरबा खेळण्याच्या ठिकाणी स्वयंसेवक नेमावेत. मोकळी मैदाने, सार्वजनिक गर्दीची ठिकाणांवर पेट्रोलिंग वाहने, बीट मार्शल्स तसेच गुन्हे शोध पथकामार्फत गस्त घालावी.

आयुक्त पुढे म्हणाले की, देवीची मिरवणुक मार्ग, दुर्गा दौड मार्गांची तपासणी करावी. तसेच मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. दररोज गर्दीचे ठिकाणी पोलीस स्टेशन तसेच गुन्हे शाखेतील अधिकारी पायी गस्त घालतील. तसेच नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे.

# आरएसएसकडून चिंचवड विधानसभेची चाचपणी!

## भाजपाअंतर्गत वाद-विवादाचा परिणाम : नव्या चेहऱ्याला संधी देण्याबाबत तर्कवितर्क

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वत्र विधानसभा निवडणुकीसाठी अनेकांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली आहे. शहरात गुजरातचे माजी गृहमंत्री तथा प्रभारी प्रदीपसिंह जडेजा यांनी शहरात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपमधील अनेक जण इच्छुक आहेत. काही पक्षातून बाहेर पडण्याच्या तयारीत असल्यामुळे आरएसएसने निष्ठावान भाजपचा सर्वमान्य उमेदवार देण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.




चिंचवड विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांच्यासह शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, शत्रुघ्न काटे, सिद्धेश्वर बारणे, शितल उर्फ विजय शिंदे इच्छुक आहेत. घराणेशाहीला विरोध करून भाजपमधील काही नगरसेवक वेगळा गट तयार करण्याच्या हालचाली करत आहेत. माजी नगरसेवक संदीप कस्पटे व पदाधिकारी राम वाकडकर यांनी पक्षाला थेट राजीनामा पाठवून नाराजी दर्शवली आहे. यामुळे चिंचवड विधानसभेत नवीन चेहरा देण्याच्या हालचाली भाजपच्या अंतर्गत गोटात सुरू आहेत.

गुजरातचे माजी गृहमंत्री प्रदीपसिंह जडेजा यांनी शहरात पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाचे बूथरचना , मतदार नोंदणी संदर्भात आढावा घेतला. पक्षाची ध्येयधोरणी, महायुती सरकारने अर्थसंकल्पात जनतेशी संबंधित घेतलेले निर्णय आणि योजना सर्वसामान्यांच्या पर्यंत पोहोचवण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बूथ यंत्रणा मजबूत करण्यासाठी जास्तीत जास्त मतदान नोंदणी करण्याच्या सूचना दिल्या. एक दिलाने काम करण्याचा सल्ला दिला.

यानंतरही चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपमधील इच्छुकामध्ये एकमत होताना दिसत नाही. वर्षानुवर्ष एकाच कुटुंबात विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व असल्याने इतर भाजपच्या कुशीत तयार झालेल्या आणि निष्ठावान लोकांनीही आगामी उमेदवारी आपल्याला मिळावी म्हणून आग्रही आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा प्रभाव आहे.

**आरएसएसच्या विचाराच्या उमेदवाराबाबत चाचपणी..**

» या मतदारसंघात भाजप पक्षाची व आरएसएसची विचारधारा असणारा मतदार मोठ्या प्रमाणावर असल्याने भाजपच्याच उमेदवाराचे प्राबल्य दिसून येते. मात्र, उमेदवार कोण राहणार यावरती या मतदारसंघातील राजकारण बदलताना दिसत आहे. हक्काचा मतदारसंघ हातातून जाऊ नये यासाठी भाजप पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या सोबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या विचाराचा उमेदवार चिंचवडमध्ये देण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे. त्यामुळे चिंचवड विधानसभेत भाजप पुन्हा विजय संपादन करण्यासाठी नव्या स्वच्छ चारित्र्याचा उमेदवारासाठी चाचपणी करत आहे अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

# पिंपरीत डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ!

## स्थानिक नागरिक व महापालिका अधिकारी यांची बैठक : रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत दिले आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असून, आतापर्यंत १७८ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. चिकुनगुन्याचे ३४ रुग्ण आहेत. शहरातील १७ हजार ५०० घरांमध्ये डेंग्यूच्या अळ्या आढळल्या आहेत. संबंधित घरमालकांकडून तसेच इतर ठिकाणांहून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात जूनपासून डेंग्यूबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. ठिकठिकाणी पाणी साचून डासांची उत्पत्ती होण्यास पोषक वातावरण निर्माण होत आहे. डासांमुळे अनेकांना डेंग्यू, मलेरिया, झिका व चिकुनगुन्या या आजारांची लागण होत आहे. या आजारांच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. आतापर्यंत नऊ लाख १० हजार ९९८ घरांची तपासणी करण्यात आली आहे. त्यांपैकी १७ हजार ४५६ घरांत डासांच्या अळ्या आढळल्या आहेत.

शहरातील दुकाने, व्यावसायिक ठिकाणे, मोकळ्या जागा अशा ४१ लाख ४५ हजार ८१८ ठिकाणांची तपासणी करण्यात आली आहे. त्यांपैकी २२ हजार ३११ ठिकाणी डासांच्या अळ्या आढळल्या आहेत. शहरातील २६४९ वाहन दुरुस्ती, भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. २५३६ बांधकाम प्रकल्प तपासण्यात आले. त्यांपैकी ३७९१ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे, तर १७८५ जणांवर दंडात्मक कारवाई केली आहे. त्यातून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरात डेंग्यूच्या रुग्णांची वाढ होत असल्यामुळे कंटेनर सर्वेक्षणाची मोहीम सुरू आहे. शहरातील बांधकाम प्रकल्प, घरे तपासण्यात येत आहेत. डेंग्यूच्या अळ्या सापडल्या, तर नागरिकांना नोटीस देण्यात येत असून दंडही वसूल केला जात आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही स्वच्छ पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी केले.

> “ आतापर्यंत ३६ हजार २७९ जणांची तपासणी केल्यानंतर ४३१३ जण डेंग्यू संशयित आढळले होते. त्यांपैकी १७८ जणांना डेंग्यूचे निदान झाले आहे. १६०८ जणांची तपासणी केल्यानंतर ३४ जणांना चिकुनगुन्याचे निदान झाले आहे. या वर्षी चाचण्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढविले आहे. डेंग्यूची रुग्णसंख्या गेल्या वर्षीपेक्षा कमी आहे.
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# बावधन परिसरात हेलिकॉप्टर कोसळलं

## अपघातात तिघांचा मृत्यू : पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याच्या बावधनमध्ये हेलिकॉप्टर कोसळल्याने तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी हिंजवडी पोलीस दाखल झाले आहेत. काही दिवसांपूर्वी मुळशीमध्ये देखील अशीच घटना घडली होती. सुदैवाने त्या घटनेत जीवितहानी झालेली नव्हती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील बावधनमध्ये सकाळी ६.४५ च्या सुमारास सुमारास हेलिकॉप्टर कोसळलं. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती हिंजवडी पोलिसांनी दिली आहे. धुकं असल्याने बराच वेळ हेलिकॉप्टर आकाशात घिरट्या घेत होतं. अखेर ते क्रॅश झालं आणि जमिनीवर कोसळलं. घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलीस पोहचले घटनास्थळी दाखल झाले आहेत.



याआधी देखील मुळशीमध्ये खासगी हेलिकॉप्टर कोसळलं होतं. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झालेली नव्हती. परंतु, त्या अपघातात काहीजण गंभीर जखमी झाले होते. आता पुन्हा एकदा हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे.

### दुर्घटनेत तिघांचा मृत्यू

» पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले, या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. हे हेलिकॉप्टर मुंबईमधील जुहू येथे जात होतं. घटनेची माहिती मिळताच आमची पथकं मदतीसाठी घटनास्थळी रवाना झाली आहेत. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गिरीशकुमार पिल्लई, प्रितमचंद भरद्वाज व परमजीत अशी या अपघातात मृत्यू झालेल्या तिघांची नावं आहेत.

### अपघात कशामुळे झाला?

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार दाट धुक्यामुळे हेलिकॉप्टरच्या उड्डाणावेळी काही अडचणी आल्या होत्या. हेलिकॉप्टरच्या उड्डाणानंतर पायलटला धुक्याचा सामना करावा लागला. हिंजवडी पोलिसांनी सांगितलं अग्निशमन दलाच्या पथकासह आम्ही आमचं पथकही घटनास्थळी पाठवलं आहे. डीजीसीए या अपघाताची चौकशी करणार असल्याचं पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितलं आहे.

# पासिंग सेंटरवर आता सीसीटीव्हीची करडी नजर

## दहावी आणि बारावीत हमखास पास करून देण्याची लेखी हमी देणारे पासिंग सेंटर, कोचिंग सेंटर आणि इंटीग्रेटेड कॉलेजेस राज्यभरात उदयाला आली आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

दहावी आणि बारावीत हमखास पास करून देण्याची लेखी हमी देणारे पासिंग सेंटर, कोचिंग सेंटर आणि इंटीग्रेटेड कॉलेजेस राज्यभरात उदयाला आली आहेत. शहरी आणि ग्रामीण भागात परीक्षा केंद्रांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. या अडवळणाच्या केंद्रावर राज्यातील अनेक विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी खास येतात. साधी रिक्षा सुद्धा न येणाऱ्या या गावांमध्ये परीक्षेच्या काळात लाखोंच्या कार उभ्या असतात. या ठिकाणी विद्यार्थ्यांना पासिंगसाठी खास व्यवस्था करण्यात आलेली असते. आता अशा परीक्षा केंद्रावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात एचएससी बोर्डाकडून सीसीटीव्हीची करडी नजर असणार आहे.



सामुहिक कॉपी प्रकाराला आळा घालण्यासाठी एचएससी बोर्डाने हे मोठे पाऊल टाकलं आहे. सीबीएसई परीक्षेच्या धरतीवर राज्यात आता परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही लावण्यात येणार आहे. या तिसऱ्या डोळ्यामुळे अशा पासिंग सेंटरच्या गोरखधंद्याला आळा बसेल, असा विश्वास शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य मंडळाच्या या धोरणामुळे परीक्षा केंद्रावरील सर्वच गैरप्रकारांना आळा बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दिवाळीनंतर दहावी आणि बारावीच्या परीक्षा केंद्राच्या झाडाझडतीलाही सुरुवात होणार आहे. विद्यार्थी सुरक्षा आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### ७५ टक्के बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक

राज्याच्या गल्लीबोळात सुरू झालेल्या कोचिंग क्लासेसचे रुपांतर इंटिग्रेटेड कॉलेजमध्ये होते. विद्यार्थ्यांना लगतच्या महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला जातो. अकरावी आणि बारावीला वर्गात न बसता केवळ प्रात्यक्षिक परीक्षेला हजर राहणे, प्रोजेक्ट जमा करणे आणि अंतिम बोर्ड परिक्षेला बसणे हा ट्रेंड सध्या सुरू आहे. जेईई, नीट आणि एमएच सीईटी अशा परिक्षांचा पूर्ववेळ अभ्यास करणे आणि औपचारिकता म्हणून अकरावी, बारावीला प्रवेश घेणे यावर आता बंधन येणार आहे. कारण ७५ टक्के बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे बोगस इंटिग्रेटेड कॉलेजवर आळा बसेल, असा विश्वास एचएससी बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी व्यक्त केला आहे.

### संवेदनशील परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही

» राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी त्याचबरोबर विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही बसविण्यासंदर्भात आदेश देण्यात आले आहेत. आतापर्यंत अनेक वेळा सीसीटीव्ही बसविणे आणि त्याचे स्टोरेज करण्याची चांगली क्षमता असावी, अशा सूचना शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना वारंवार देण्यात आल्या आहेत. बोर्डाकडून तयार केलेल्या यादीतील संवेदनशील परीक्षा केंद्रावर आता सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहे. त्यामुळे सामुहिक कॉपी करणारे विद्यार्थी, त्यांना मदत करणारे नातेवाईक आणि काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सीसीटीव्हीचा जालीम उपाय करण्यात आला आहे.

### तर परीक्षा केंद्रच रद्द..

परीक्षा केंद्र कायम ठेवायचे असल्यास सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य करण्यात आल्याची माहिती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिली आहे. यासंदर्भात 'सीविक मिरर'ला माहिती देताना महाराष्ट्र राज्य माध्यमक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे (एचएससी बोर्ड) अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, "आजही अनेक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नाही. त्यामुळे ही परिस्थिती पाहता आता सीबीएसई बोर्डाच्या धरतीवर फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणाऱ्या बोर्डाच्या परीक्षेसाठी सीसीटीव्ही बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही नसतील, त्यांचे परीक्षा केंद्रच रद्द होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसोबतच परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या दिवाळीनंतर परीक्षा केंद्राच्या झाडाझडतीला सुरुवात होणार आहे."